# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.11.2024** **वार – शुक्रवार**

---

**लक्ष्मीपूजन आणि बलिप्रतिपदा**

दीपावलीच्या प्रकाशपर्वतील लक्ष्मीपूजनाचा उत्साह आज सर्वत्र पाहायला मिळत असून, मुहूर्तावर लक्ष्मीसहित कुबेर पूजनाची लगबग घरोघरी तसंच दुकानं, खासगी आणि सार्वजनिक कार्यालये, सराफी पेढ्या, कारखाने, कंपन्यांमध्ये सुरू आहे. लक्ष्मीच्या स्वागतासाठी, स्वच्छता करण्यात येत असून, आकर्षक रंगीबेरंगी रांगोळ्यांनी, सजावट करण्यात येत आहे. रोखे बाजारात मुहूर्ताचे सौदे करण्यासाठी आज संध्याकाळी विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. दिवाळीच्या सणात उद्या शनिवारी, बलिप्रतिपदा अर्थात पाडवा आहे. या पाडव्याला व्यापारी वर्गाचे, विक्रम संवत्सर सुरू होतं . त्यामुळे व्यापारी वर्गात बलिप्रतिपदेला विशेष महत्व आहे. पती पत्नीच्या नात्यात देखील पडव्याचे महत्व असून या दिवशी अन्नकूट अर्थात गोवर्धन पूजा करण्यात येते.

**आरटीओची कारवाई**

दिवाळीनिमित्त बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांची खासगी बसचालकांकडून लूट होण्याच्या पार्श्वभूमीवर पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने विशेष मोहीम हाती घेतली होती. त्या मोहिमेअंतर्गत शहरातील 106 खासगी बसची तपासणी वायुवेग पथकाने केली. त्यापैकी 65 बसचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून त्यांना विविध कारणांमुळे, आरटीओन 4 लाख 64 हजार रुपये दंड ठोठावला आहे. त्यापैकी  एक लाख 78 हजार रुपयांचा दंड वसूल केला असल्याची माहिती  पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी दिली आहे .

**पुणे कृषी महाविद्यालय**

पुणे  कृषी महाविद्यालयाच्या बोटॅनिकल गार्डनमधील जागा मैलापाणी शुद्धीकरण केंद्रासाठी देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या सभेत या प्रकल्पासाठी 30 गुंठे जागा देण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली असून याला राज्य सरकारने मान्यता द्यावी, अशी शिफारस करण्यात आली. नदी शुद्धीकरण प्रकल्पाच्या निविदांसाठी केंद्र सरकार आणि अर्थसहाय्य करणारी जायका यांनी निविदा प्रक्रियेला मान्यता असून यामध्ये 11 ठिकाणी मैलापाणी शुद्धीकरण केंद्र

उभारणे, सुमारे 113 किलोमीटर लांबीच्या मलवाहिन्या विकसित करणे,  अशा 13 कामांचा समावेश आहे. हा प्रकल्प एकंदर 1475 कोटींचा आहे.

**मतदारांची नोंदणी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 साठी राज्यात, 9 कोटी 70 लाख 25 हजार 119 मतदारांची नोंदणी झाली आहे. त्यामध्ये पुरूष मतदार 5कोटी 22 हजार 739, महिला मतदार 4 कोटी 69 लाख 96 हजार 279 असून  तृतीयपंथी मतदार 6 हजार 101 आहे.  मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयान ही माहिती  दिली आहे. राज्यात सर्वात जास्त मतदार पुणे जिल्ह्यात असून  सर्वात कमी मतदारांची संख्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे. या व्यतिरिक्त राज्यात सेवादलातील अर्थात सर्व्हिस व्होटर, मतदारांची नोंदणी 1 लाख 16 हजार 170 झाली असून वयाची शंभरी पार केलेल्या 47 हजार 389 मतदारांची नोंदणी झाली आहे.

**दिव्यांग मतदार**

पुणे जिल्ह्यात सर्वाधिक 12101 दिव्यांग मतदार चिंचवड विधानसभा मतदार संघात तर सर्वात कमी म्हणजेच 1689 दिव्यांग मतदार मावळ मतदार संघात आहेत, दिव्यांग मतदारांसाठी सर्व मतदार संघात विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे.

**स्त्रीशक्ती पुरस्कार**

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसतर्फे देण्यात येणारा सूर्यदत्त स्त्रीशक्ती राष्ट्रीय पुरस्कार 2024 राजयोग शिक्षिका बी के डॉ सुनीता यांना प्रदान करण्यात आला आहे.  सन्मानचिन्ह आणि पत्र अस पुरस्काराचे स्वरूप असून अध्यात्मिकता, प्रेरणा आणि जगभर मूल्याधिष्टित शिक्षणाचा प्रसार या त्यांच्या कार्याबद्दल तो देण्यात आला आहे.

**दिवाळी पहाट**

आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या वतीनं येत्या  रविवार सकाळी 7 वाजता दिवाळी पहाट कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. तो टिळक स्मारक मंदिर इथं कार्यक्रम होणार असून त्यासाठी सर्वांना विनामूल्य आहे.

**ब्राह्मण समाज पाठिंबा**

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूकीसाठी, भारतीय जनता पक्षाला आणि त्यासोबतच्या महायुतीला सकल ब्राह्मण समाज एकमुखानं पाठिंबा जाहीर केला आहे.महायुतीनं ब्राह्मण समाजातील उमेदवारांना

देखील प्राधान्य दिल्यानं हा पाठिंबा जाहीर केल्याची घोषणा आज ब्राह्मण संघटनांचे मुख्य समन्वयक भालचंद्र कुलकर्णी यांनी केली.

**गोळीबार**
येरवडा परिसरात, पार्किंगच्या वादातून गोळी बाराची घटना घडली आहे. निवृत्त लष्करी अधिकाऱ्याने एका व्यक्तिवर गोळीबार असून गोळी टेम्पो चालकाला लागली.उपचार सुरू असतांना या टेम्पोचालकाचा मृत्यू झाला आहे. ही घटना काल रात्री येरवडा इथल्या अशोक नगर येथे घडली.

**हवामान**
पुणे आणि परिसरात उद्या आकाश निरभ्र राहील, तर कमाल तापमान 33 अंशांच्या आसपास राहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत.उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर,संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,**
**नमस्कार.**